
सयाजी ज्ञानमाला : ४

# भीमराव ते बाबासाहेब एक 'क्रांतीपर्व'

## सयाजीराव - बाबासाहेब ऋणानुबंध

दिनेश पाटील




महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

सयाजी ज्ञानमाला : ४

# भीमराव ते बाबासाहेब
# एक 'क्रांतीपर्व'

## सयाजीराव - बाबासाहेब ऋणानुबंध

दिनेश पाटील

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

भीमराव ते बाबासाहेब
एक 'क्रांतीपर्व'
इतिहास
दिनेश पाटील
●
प्रकाशन क्रमांक - २४
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

सयाजी ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : दिनेश पाटील
फ्लॉट ११४, सत्यवती कॉलनी,
जाखले-वारणानगर
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर ४१६११३
९६२३८५८१०४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३० रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# सयाजी ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी सयाजी ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही सयाजी ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**सयाजी ज्ञानमाला**
**ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# भीमराव ते बाबासाहेब
# एक 'क्रांतीपर्व'

सयाजीरावांनी वयाच्या १४ व्या वर्षी १८७७ मध्ये अहमदाबाद येथे अस्पृश्यांसोबत सहभोजन करून अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला सुरुवात केली. १८८३ मध्ये आपल्या लक्ष्मीविलास राजवाड्यातील खाजगी खंडोबाचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले. १८८४ मध्ये फुलेंच्या बडोदा भेटीत त्यांची समाजसुधारणेवरील तीन व्याख्याने सयाजीरावांनी आयोजित केली होती. या व्याख्यानांचे विषय अनुक्रमे 'दलितोद्धार', 'स्त्रीस्वातंत्र्य' आणि 'हिंदुस्थानातील शेतकरी' असे होते. १८८६ मध्ये राजवाड्यातील अस्पृश्यांसाठी वेगळ्या जेवणाच्या पंगतीची पद्धत सयाजीरावांनी स्वत: त्या पंगतीत बसून मोडली. २३ जानेवारी १९१० रोजी सयाजीरावांनी बडोद्यातील सर्व अस्पृश्य विद्यार्थ्यांना राजवाड्यात मोठी मेजवानी दिली.

१९०६ ते १९१० अशी ४ वर्षे सयाजीरावांनी दिलेल्या शिष्यवृत्तीच्या जोरावर श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी सादर केलेल्या 'द हिस्ट्री ऑफ कास्ट इन इंडिया' या प्रबंधाला

अमेरिकेतील कोर्नेल विद्यापीठाने १९११ मध्ये पीएच.डी. पदवी प्रदान केली. संपूर्ण जगातील जातीवरील हा पहिला पीएच. डी. प्रबंध होता. 'जात म्हणजे बंदिस्त वर्ग' ही या प्रबंधातील व्याख्या बाबासाहेबांनी त्यांच्या जातविषयक संशोधनात आधारभूत म्हणून वापरली होती. २३-२४ मार्च १९१८ रोजी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मुंबई येथे भरवलेल्या दुसऱ्या अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषदेचे अध्यक्ष सयाजीराव होते. या परिषदेत मांडण्यात आलेल्या भारतातील पहिल्या अस्पृश्यता निवारण ठरावावर उपस्थित मान्यवरांपैकी शंभरहून अधिक लोकांनी सह्या केल्या. त्यामध्ये पहिली सही करणारी व्यक्ती सयाजीराव गायकवाड होते. तर टिळकलिखित 'गीतारहस्य' ग्रंथाची चिकित्सा करताना या ग्रंथात टिळकांनी मांडलेली जातीविषयक भूमिका अत्यंत मागासलेली असल्याचे मत महाराजांनी स्पष्टपणे नोंदवले होते.

१९२५ मध्ये सयाजीरावांनी आपल्या लक्ष्मीविलास राजवाड्यात सर्व जातीयांसाठी सहभोजनाचे आयोजन केले होते. त्याचवर्षी त्यांनी अमरेली येथील सार्वजनिक मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले. १९३२ मध्ये सयाजीरावांनी कोणत्याही आंदोलनाशिवाय बडोदा संस्थानातील सर्व सरकारी मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली केली. १९३३ मध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांनी लिहिलेला 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा ग्रंथ सयाजीरावांना अर्पण केला. १९३६ मध्ये सयाजीरावांनी

राज्यकारभाराच्या हीरकमहोत्सवी प्रसंगी अस्पृश्य उद्धारासाठी खाजगी फंडातून एक कोटी रुपयांचा निधी राखून ठेवला होता. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम १५९ कोटी रु. भरते. यावरून विठ्ठल रामजी शिंदेंनी अस्पृश्योद्धाराच्या कामाबाबत फुल्यांना ओलांडून सयाजीरावांना पहिला क्रमांक का दिला होता याचा उलगडा होतो.

ही प्रस्तावना बाबासाहेब आणि सयाजीराव हे नाते समजून घेण्यासाठी जशी आवश्यक आहे त्यापेक्षाही अधिक म्हणजे अस्पृश्यता निर्मूलन हा सयाजीरावांच्या धोरण आणि प्रशासनाचा केंद्रबिंदू कसा होता हे कळावे म्हणून केली आहे. कारण १९०९ च्या सयाजीरावांच्या 'Depressed Classes' या क्रांतिकारक निबंधात सयाजीरावांनी 'अस्पृश्यतायुक्त भारत म्हणजे राष्ट्रीय आत्महत्या आहे' हा सिद्धांत मांडला होता. पदवी शिक्षणापासून ते डॉक्टरेटच्या प्रबंधापर्यंत सयाजीराव नावाचा 'वटवृक्ष' बाबासाहेबांच्या वाळवंटातील संघर्षात 'समतेची सावली' म्हणून अखंड साथ देत होता. अतिशय दूरदृष्टीने सयाजीरावांनी बाबासाहेबांना अमेरिकेला पाठवून जातिभेद आणि वंशभेदाचे तुलनात्मक भान असणारा वैश्विक नेता राष्ट्रीय कर्तव्य म्हणून घडवला होता. पुढे १९२० मध्ये या नेतृत्वाची अधिकृत घोषणा राजर्षी शाहूंनी ऐतिहासिक माणगाव परिषदेत केली हे आपण जाणतोच. सयाजीराव आणि बाबासाहेब यांच्यातील नाते समजून घेण्याचा प्रयत्न आपण पुढील टप्प्यांच्या आधारे करू.

## भारतातील शिक्षण आणि शिष्यवृत्ती माफी

बाबासाहेब मॅट्रिक झाल्यानंतर कृष्णाजी अर्जुन केळूसकरांनी सी.के.बोले. यांच्या हस्ते त्यांचा सत्कार घडवून आणला. त्यावेळी केळूसकरांनी त्यांचे बुद्ध चरित्र बाबासाहेबांना भेट दिले. या बुद्ध चरित्राच्या माध्यमातूनच बाबासाहेबांना बुद्धाचा पहिला परिचय झाला. बाबासाहेब मॅट्रिक झाले. परंतु त्यावेळी त्यांच्या वडिलांची आर्थिक परिस्थिती इतकी हलाखीची होती की बाबासाहेबांना पुढील शिक्षण देणे त्यांना शक्य नव्हते. याचवर्षी दामोदर यंदे यांच्यामार्फत त्यांनी बाबासाहेबांना सयाजीरावांकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळवून दिली. १९०८ ते १९१३ या ४ वर्षांच्या कालावधीत मुंबईतील पदवी शिक्षणासाठी बाबासाहेबांना सयाजीरावांनी दरमहा २५ रु. प्रमाणे एकूण १,८०० रु. शिष्यवृती दिली. ही शिष्यवृत्ती माफ करून सयाजीरावांनी बाबासाहेबांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत पाठवले.

## परदेशी शिक्षण आणि शिष्यवृत्ती माफी

बाबासाहेबांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेलाच पाठवण्याचा निर्णय सयाजीरावांनी का घेतला? या प्रश्नाचे उत्तर बाबासाहेबांचा एक व्यक्ती म्हणून विचार केला तर कळणार नाही. पण भारतातील सामाजिक विषमतेचे प्रतीक म्हणून बाबासाहेबांचा विचार केला तर त्यातून सयाजीरावांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय येतो. त्या कालखंडात परदेशातील शिक्षणासाठी इंग्लंड हा देश

निवडला जात होता. ज्यावेळेला महाराजांनी बाबासाहेबांना कोणत्या विषयाचा अभ्यास करावासा वाटतो? हा प्रश्न विचारला त्यावेळी बाबासाहेबांनी दिलेल्या उत्तराला अनुसरून इंग्लंडऐवजी अमेरिका ही निवड सयाजीरावांनी केली. स्वत: सयाजीरावांनी बडोद्यातील आर्थिक धोरणे मुख्यत: अमेरिकन आर्थिक विचारांना समोर ठेवून आखली होती. वांशिक संघर्ष सुरू असलेली तत्कालीन अमेरिका वंशविषयक संशोधनात सर्वात प्रगत मानली जात होती. बाबासाहेबांनी जातीवरचा पहिला शोधनिबंध 'कास्ट्स इन इंडिया: देयर मेकॅनिझम, जेनिसीस अँड डेव्हलपमेंट' अमेरिकेत कोलंबिया विद्यापीठात शिकत असतानाच (१९१६) सादर केला होता. हा योगायोग नव्हता तर महाराजांनी ज्या उद्देशाने बाबासाहेबांना अमेरिकेला पाठवले त्या उद्देशाच्या दिशेने बाबासाहेबांनी टाकलेले हे पहिले पाऊल होते.

एक विद्वान समाजसुधारक घडवण्याचा अंतस्थ हेतू ठेवूनच सयाजीरावांनी बाबासाहेबांना शिष्यवृती दिली होती. या संदर्भात अविनाश डोळस म्हणतात, "खरं म्हणजे या काळात जगात इंग्लंड व त्यातही लंडनमधील विद्यापीठ हे जगावर बौद्धिक क्षेत्रात राज्य करत होती. ऑक्सफर्ड, केंब्रिज यांचा शैक्षणिक क्षेत्रात दबदबा होता. जगाचे बौद्धिक केंद्र म्हणून ओळखले जात होते. असे असताना सयाजीराव गायकवाड महाराजांनी डॉ. बाबासाहेब आबेडकरांची इंग्लंडऐवजी अमेरिकेची का निवड केली ही विचार करायला लावणारी गोष्ट आहे. भारतातील जातिव्यवस्था,

तिचे दुष्परिणाम, त्यातून देशाला आलेले दौर्बल्य याचा प्रत्यय बाबासाहेबांना उत्तरोत्तर येत होता. सयाजीराव गायकवाड महाराज जगभर दौरे करत होते. जगामध्ये नवे काय आहे याचा त्यांना अखंड शोध सुरू असायचा. बडोदे संस्थानात त्यांनी हे नवे ज्ञान, संस्था यांना एक जागा करून दिली होती. विद्वानांशी त्यांची जवळीकता होती. मानववंशशास्त्र, समाजशास्त्र या विषयातील अयावत अभ्यास अमेरिकेत वंशवादाच्या पार्श्वभूमीवर अधिक प्रगत झाला होता.”

१९१३ ते १९१६ या कालावधीत कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी एम.ए. आणि पीएच.डी. या पदव्या महाराजांच्या शिष्यवृत्तीवर मिळवल्या. यानंतर इंग्लंडमध्ये जाऊन अर्थशास्त्रातील उच्च पदव्या घेण्याचा मनोदय फेब्रुवारी १९१६ मध्ये सयाजीरावांना पत्र लिहून व्यक्त केला. परंतु बडोद्याचे विद्याधिकारी आणि दिवाण यांनी शिष्यवृत्तीची मुदत वाढविण्यास नियमांचा तांत्रिक आधार घेत नकार दिला. यानंतर प्रा. सेलीगमन यांच्या शिफारस पत्रासह दुसरे पत्र त्यांनी महाराजांना लिहिले. महाराजांनी सर्व बाबींचा विचार करून शिष्यवृत्ती एक वर्षाने वाढवली. त्यामुळे १९१६ ते १९१७ या इंग्लंडमधील शिक्षणासाठी सयाजीरावांची मदत झाली.

जून १९१६ मध्ये ‘नॅशनल डिव्हिडन्ड ऑफ इंडिया-अ हिस्टॉरीकल अँड ॲनॅलिटिकल स्टडी’ हा पीएच.डी. प्रबंध बाबासाहेबांनी कोलंबिया विद्यापीठाला सादर केला. अस्पृश्य

जातीतील पहिली डॉक्टरेट अशा पद्धतीने सयाजीरावांच्या दूरदृष्टीतून साकार झाली. ही भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासातील क्रांतिकारक घटना होती. पुढे आठ वर्षांनी १९२४ मध्ये हा प्रबंध विस्तृत स्वरूपात 'दि इव्हॅल्युशन ऑफ प्रॉव्हिन्शल फायनॅन्स इन ब्रिटिश इंडिया' या नावाने लंडनमधील पी.एस. किंग अँड सन्स यांनी प्रकाशित केला. बाबासाहेबांनी हा ग्रंथ श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांना अर्पण करून आपली कृतज्ञता व्यक्त केली.

भारतातील चार वर्षे, अमेरिकेतील तीन वर्ष आणि इंग्लंडमधील एक वर्ष अशी आठ वर्षे सयाजीरावांनी शिक्षणासाठी बाबासाहेबांना एकूण सुमारे २५,७४२ रु. शिष्यवृत्ती दिली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ९८ लाख रु.हून अधिक भरते. बाबासाहेबांना आधुनिक शिक्षण देऊन एक प्रकारे आधुनिक भारतातील अस्पृश्यांचा सर्वोच्च नेताच सयाजीरावांनी द्रष्टेपणाने घडविला. बडोदा सरकारच्या शिष्यवृत्ती नियमाप्रमाणे एका विद्यार्थ्याला एकदाच शिष्यवृत्तीचा लाभ मिळत असे. परंतु बाबासाहेबांना महाराजांनी नियम मोडून तीन वेळा शिष्यवृत्ती दिली. महाराजांनी शेकडो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिल्या. परंतु बाबासाहेबांचा अपवाद वगळता इतर कोणालाही दुसऱ्यांदा शिष्यवृत्ती मिळालेली नाही. यावरून बाबासाहेब सयाजीरावांसाठी एक 'विशेष' बाब होते याचा पुरावा मिळतो.

१९१७ ला सयाजीरावांनी त्यांची बडोद्याच्या मिलिटरी डिपार्टमेंटमध्ये नेमणूक केली. वडील आजारी असल्याची तार मिळाल्याने बाबासाहेब तातडीने मुंबईला परतले. या संधीचा लाभ घेत शिष्यवृती घेऊनही बाबासाहेबांनी बडोद्यात काम केले नाही म्हणून त्यांच्यावर संस्थानाने केलेला खर्च त्यांनी परत करावा अशी पत्रे बडोदा प्रशासनाकडून आंबेडकरांना वारंवार पाठवण्यात आली. महाराज नियम आणि शिस्त पाळण्यात फार आग्रही असत याचा अवाजवी फायदा या प्रकरणात प्रशासनाने घेतला असण्याची शक्यता अधिक आहे. या संदर्भात बाबासाहेबांचे चरित्रकार धनंजय कीर म्हणतात, "मध्यंतरी बडोदा सरकारच्या अधिकाऱ्यांनी आंबेडकरांच्या शिक्षणासाठी झालेला खर्च परत मिळावा म्हणून आंबेडकरांच्या पाठीमागे निष्ठूरपणे तगादा लावला होता. त्यांनी या बाबतीत सिडनहॅम महाविद्यालयाच्या प्राचार्यांना लिहिले. मुंबईतील सरकारी शिक्षणाधिकाऱ्यांना कळविले. ... या सबंध प्रकरणात एक गोष्ट अशी दिसते की, महाराजांना या प्रकरणाविषयी बडोद्याच्या दिवाणांनी बराच काळ अज्ञानात ठेवले होते. शेवटी महाराजांकडे हे प्रकरण गेले. त्यांनी त्या प्रकरणावर असा शेरा मारला की, ही रक्कम शिक्षणासाठी खर्च झाली आहे. अर्थात वसुलीचा प्रश्नच उद्भवत नाही. तरीसुद्धा बडोद्याच्या सचिवालयातील अरेरावांनी आंबेडकरांचा छळ थांबविला नाही. ... पुन्हा एकदा बडोदे नरेशांकडून थप्पड बसताच हताश होऊन शेवटी मंत्रिमंडळाच्या एका बैठकीत १९३२ साली त्यांनी हे प्रकरण एकदाचे निकालात काढले."

१९३३ मध्ये पुण्याच्या अहिल्याश्रम भेटीवेळी केलेल्या भाषणात बाबासाहेबांनी बडोदा सोडण्याच्या प्रसंगावर भाष्य करताना सयाजीराव म्हणतात, “अस्पृश्यवर्गीय पुढारी डॉ. आंबेडकर यांना शिक्षणासाठी मीच मदत केली व त्यांना अमेरिकेत उच्च शिक्षण माझ्या खर्चाने दिले, ही गोष्ट खरी आहे. शिक्षण घेऊन परत आल्यावर त्यांना मी बडोद्यात नोकरीही दिली होती. परंतु त्यांना राहावयास घरासंबंधी काही अडचण आल्यामुळे ते मुंबईस गेले. ते गेल्यामुळे त्यांच्यावर आमचा रोष न होता आम्हास एक प्रकारे आनंदच झाला. कारण त्यांना शिकवून आणण्याचा आमचा मुख्य हेतू त्यांनी शहाणे होऊन आपल्या समाजाच्या उद्धाराचे काम करावे हाच होता व ते काम त्यांनी नेटाने हाती घेतलेले पाहून आमचा हेतू सफल झाला असेच आम्हास वाटते.” यातून महाराजांच्या विशाल मानवतावादी धोरणाचा परिचय होतो.

## बाबासाहेबांची बडोद्यातील निवासाची व्यवस्था

१९३९ मध्ये बाबासाहेबांनी लिहिलेल्या ‘Waiting For Visa’ या आत्मपर निबंधात बडोद्यात त्यांना अस्पृश्यतेचे अनुभव कसे आले याचे विस्तृत तपशील आले आहेत. यामध्ये ऑफिसमध्ये मिळणारी वागणूक, राहत्या जागेसंदर्भात आलेल्या समस्या याबाबत माहिती मिळते. ही माहिती वाचल्यानंतर वाचक सयाजीरावांना आरोपीच्या पिंजऱ्यात वारंवार उभा करताना दिसतात. बडोद्यात पारशी गेस्ट हाऊसमध्ये अत्यंत

वेदनादायी अनुभव वाचून आपण अस्वस्थ होतो. परंतु महाराजांनी बाबासाहेबांच्या निवासासाठी पंडित आत्माराम यांचा पर्याय बाबासाहेबांना दिला होता. याबाबतचे तपशील वरील आत्मपर निबंधात आढळत नाहीत. विशेष बाब म्हणजे या संदर्भात बाबासाहेबांनी महाराजांशी काही पत्रव्यवहार केला होता याबाबतचे संदर्भही सापडत नाहीत. या पार्श्वभूमीवर पुढील पत्राचा विचार केला असता या संदर्भातील महाराजांची भूमिका स्पष्टपणे अधोरेखित होते.

७ जून १९१८ रोजी बडोद्याचे तत्कालीन दिवाण मनुभाई देसाई यांनी बाबासाहेबांच्या संदर्भाने सर चंदावरकर यांना पत्र लिहिले होते. या पत्रात देसाई लिहितात, "शेवटचा महत्त्वाचा मुद्दा एक विशेष केस म्हणून महाराजसाहेबांनी भीमराव आंबेडकर यांना सरकारी गेस्ट हाउसमध्ये राहण्याची परवानगी दिली आहे. तसेच भीमराव यांना राहण्यासाठी नवे घर बांधण्याचा प्लॅन आणि खर्चाचा अंदाज काढून लवकर कार्यवाहीचे आदेश दिले आहेत." महाराजांनी बाबासाहेबांसाठी स्वतंत्र घर बांधण्याचा निर्णय घेतला त्यावेळी बाबासाहेब हे उच्चशिक्षित दलित तरुण भीमराव होते. १९२७ नंतर ते दलितांचे नेते बाबासाहेब झाले. या पार्श्वभूमीवर तर महाराज बाबासाहेबांबाबत किती सन्मानजनक विचार करत होते हे समजून घेणे गरजेचे आहे. बाबासाहेबांची खरी किंमत ओळखणारा सयाजीरावांइतका प्रांजळ प्रशासक भारताच्या इतिहासात आजवर झाला नाही.

बाबासाहेबांना मिळालेल्या या जातिवाचक वागणुकीचा पूर्वार्ध म्हणजे कुणबी-मराठा लेखक कृष्णराव अर्जुन केळूस्कर यांना बडोद्यात मिळालेली वागणूक होय. केळूस्करांना १८९७ मध्ये उपनिषदांचे भाषांतर करण्याचे अर्धे काम दिले, तर अर्धे काम शंकर मोरो रानडे यांना दिले. ही बाब बडोद्यातील ब्राह्मणांना अजिबात आवडली नाही. कारण एका शूद्राने वेदांचे भाषांतर करणे बडोद्यातील ब्राह्मणांना अपमानजनक वाटले. त्यांनी केळूस्करांना या कामात प्रचंड त्रास दिला. परंतु केळूस्करांनी अतिशय चिवटपणे आणि कौशल्याने यावर मात केली. राजा मराठा जातीचा असूनही मराठा केळूस्करांना जेथे त्रास झाला तेथे अस्पृश्य जातीचा म्हणून बाबासाहेबांना झालेला त्रास स्वाभाविक होता. यामध्ये महाराजांनी जाणीवपूर्वक या त्रासाकडे दुर्लक्ष केले असे म्हणण्याला कोणताही आधार सापडत नाही. तसेच या संदर्भात बाबासाहेबांनी महाराजांशी संवाद केल्याचा संदर्भ सापडत नाही. तो संवाद झाला असता तर त्याचा सकारात्मक परिणाम नक्की झाला असता असे महाराजांच्या बाबासाहेबांबाबतच्या एकूण धोरणावरून वाटते.

## शिक्षणाव्यतिरिक्त आर्थिक पाठबळ

१९१७ मध्ये शिक्षणपूर्तीनंतर लंडनहून परतताना बाबासाहेब कैसर-इ-हिंद बोटीने पुढे आले. त्यांचा सर्व मौलिक ग्रंथसंग्रह घेऊन येणाऱ्या थॉमस कुक अँड कंपनीच्या बोटीला टॉर्पेडो वादळामुळे भूमध्य सागरात अपघात झाला. त्यामुळे बाबासाहेबांच्या

ग्रंथसंग्रहाचे नुकसान झाले. महाराजांना हे कळल्यानंतर नुकसान भरपाई म्हणून महाराजांनी बडोदा संस्थानाकडून ५०० रुपये मदत बाबासाहेबांनी न मागता दिली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम सुमारे १३ लाख रु.हून अधिक भरते. तर नुकसान भरपाई म्हणून कंपनीकडून त्यांना ४०० रुपये मिळाले. विमा कंपन्यांनी दिलेल्या नुकसान भरपाईपेक्षा ही रक्कम जास्त होती. महाराजांचा बाबासाहेबांबद्दलचे प्रेम आणि आदर व्यक्त होतो.

१९३१ च्या गोलमेज परिषदेला उपस्थित डॉ. आंबेडकरांचे विद्वत्तापूर्ण भाषण आणि दलित व अस्पृश्यांबद्दलचे विचार ऐकल्यानंतर सयाजीरावांनी खुश होऊन बाबासाहेबांना लंडनमधील हॅन्स क्रिसेंट हॉटेलमध्ये पार्टी दिली. या पार्टीत भाषण करताना सयाजीरावांनी बाबासाहेबांचे कौतुक करताना त्यांच्या पूर्वायुष्याचीदेखील उपस्थितांना माहिती दिली. या संधीचा लाभ उठवत बाबासाहेबांनी भारतातील आपल्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्यासाठी आर्थिक मदत देण्यासंदर्भात छापील विनंती पत्र पार्टीतील सर्व उपस्थितांना वाटले. यावेळी या विनंतीला मान देऊन अनेकांनी देणग्या दिल्या. सयाजीरावांनी केलेल्या मदतीसह (१५० पौंड) एकूण १३३५ पौंडांची मदत बाबासाहेबांना यावेळी मिळाली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ४ कोटी ४४ लाख रु.इतकी होते. ३ वेळा शिष्यवृत्ती माफी, ग्रंथांची नुकसानभरपाई आणि गोलमेज परिषदेतील मदत ही रक्कम एकत्र केली असता आजच्या रुपयाच्या मूल्यात

५ कोटी ४७ लाख रु. इतकी भरते. १८८२ पासून पुढे ५८ वर्षे बडोदा संस्थानात अस्पृश्योद्धारासाठी केलेले काम आणि बाबासाहेबांना केलेली ही आर्थिक मदत याचा एकत्रित विचार करता भारतातील अस्पृश्योद्धाराच्या इतिहासात सयाजीरावांना तोड नाही. परंतु दुर्दैवाने या इतिहासात सयाजीरावांच्या वाट्याला एक ओळ येऊ नये याच्यासारखी दुसरी शोकांतिका नाही.

## वैचारिक पाठबळ

अमेरिकेहून परतलेल्या बाबासाहेबांना बडोद्याचे अर्थमंत्री करण्याचा महाराजांचा विचार होता. परंतु ते शक्य झाले नाही. अखेर सयाजीरावांनी बडोद्याचे कायदे मंडळ असणाऱ्या धारा सभेवर आंबेडकरांची नियुक्ती केली. राजा कितीही पुरोगामी असला तरी प्रशासनात काम करणारे सर्वच घटक पुरोगामी धोरण स्वीकारतील असे नाही. म्हणूनच धारा सभेवर बाबासाहेबांना नेमत असताना महाराजांनी धारा सभेवरील नियुक्ती संदर्भातील नियमात सुधारणा करून विशेष निवडणूक कायदा केला. या कायद्यानुसार ज्या सदस्यांची अस्पृश्य सदस्यांसोबत कायदे मंडळात बसण्याची तयारी आहे त्यांनाच धारा सभेची निवडणूक लढवता येणार होती. हा निर्णय सयाजीरावांचा अस्पृश्यता निवारणाचा प्रामाणिक आग्रह आणि सर्वांना न्याय देण्यासाठीची त्यांची धडपड अधोरेखित करतो.

१९३२ मध्ये गांधी आणि आंबेडकर यांच्यामध्ये राखीव जागांवरून संघर्ष झाला होता. २२ सप्टेंबर १९३२ ला टाटा सन्स अँड कंपनीच्या ए.डी. नौरोजी यांना महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाबाबतच्या वादासंदर्भात लिहिलेल्या पत्रात सयाजीराव म्हणतात, “तुमची तार मिळाली. मला वाटते की, तथाकथित उच्च हिंदू त्यांनी वागायला हवे, तसे वागत नाहीत. त्यांनी अस्पृश्यता पूर्णपणे दूर केली पाहिजे. हिंदुत्वामधील दुही टाळायची असेल तर सर्व जातीतील लोकांना समान संधी द्यायला हवी. डॉ. आंबेडकरांची समजूत घालू शकलो नाही, याचा खेद वाटतो. श्री.गांधी यांनी उपोषणाचा आग्रह धरू नये, त्यांच्या त्यागामुळे काहीही साध्य होणार नाही,” या पत्रात त्यांनी नेमक्या शब्दात या प्रश्नावर प्रकाश टाकला आहे. यावरून लोकांना मदत करत असताना यामध्ये त्या व्यक्तीचा फक्त वैयक्तिक उत्कर्ष एवढा संकुचित विचार नव्हता. तर समाजाच्या रचनात्मक कल्याणाची विशाल दृष्टी होती हेच सिद्ध होते.

बाबासाहेबांच्या जडणघडणीतील ‘बडोदा अध्याया’चे योगदान दुर्दैवाने आजपर्यंत अज्ञात राहिले. बडोदा महाराष्ट्राचे ऊर्जाकेंद्र कसे होते हे समजून घेण्याच्या प्रवासातील बाबासाहेब आंबेडकर हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. हे वरील सर्व तपशिलांचा एकत्रित विचार करता स्पष्ट होतो. त्यामुळेच महाराष्ट्राचे एक महान भूमिपुत्र म्हणून बाबासाहेबांचा विचार करत असताना

सयाजीराव गायकवाडांना वगळून पुढे का जाता येत नाही याचे नेमके मर्म भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद २०१८ मध्ये बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या ६६ व्या पदवीदान समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून केलेल्या भाषणात सयाजीरावांबद्दल व्यक्त केलेल्या कृतज्ञतेतून स्पष्ट होते. या भाषणात भारताचे राष्ट्रपती कोविंद म्हणतात, **"Gaekwad III had sent B.R. Ambedkar abroad for higher studies by providing him a scholarship and later employed the Dalit icon in his darbar. If Gaekwad III had not helped Ambedkar, he couldn't have achieved whatever he achieved in his life."**

## सयाजीराव, आंबेडकर आणि बौद्ध धर्म

१९०६ मध्ये बाबासाहेबांना शिष्यवृत्तीसाठी केळूसकर गुरुजी यंदेंमार्फतच सयाजीरावांकडे घेऊन गेले. केळूसकरांचे फक्त मराठीतीलच नाही तर कोणत्याही भारतीय भाषेतील पहिले बुद्ध चरित्र १८९८ मध्ये प्रकाशित झाले. या बुद्ध चरित्रामुळेच बाबासाहेबांना बुद्धाचा परिचय झाला. या ग्रंथाचे बाबासाहेबांच्या वैचारिक जीवनातील आणि धर्मांतराच्या निर्णयातील स्थान निर्णायक होते.

सयाजीरावांनी १९१० मध्ये बडोद्यातील ज्युबिली बागेत बुद्धाचा पुतळा जपानहून आणून बसवला होता. विशेष म्हणजे या पुतळ्याच्या चबुतऱ्यावर बुद्धाची वचने कोरलेली होती. हा

आधुनिक भारतातील बुद्धाचा पहिला पुतळा होता. बाबासाहेबांचा १९१३ पासून बडोद्याशी असणारा प्रत्यक्ष संपर्क विचारात घेता केळूस्करांच्या बुद्ध चरित्राबरोबरच या पुतळ्यानेसुद्धा बुद्धाच्या समतावादाकडे नेणारी पायवाट बाबासाहेबांच्या उमेदीच्या वयात तयार केली होती. महाराजांच्या अभ्यासाच्या टेबलवर बुद्धाची मूर्ती विराजमान होती. बडोद्यात बुद्ध जयंती साजरी केली जात होती. बडोद्याच्या सेन्ट्रल लायब्ररीमध्ये बुद्ध धर्मावरील जगातील सर्वोत्तम ग्रंथ त्यावेळी उपलब्ध होते. बडोद्याच्या प्राच्यविद्या संस्थेने बौद्ध धर्मातील मूळ ग्रंथ प्रकाशित केले होते. महाराजांनी मराठीमध्ये बौद्ध धर्मावरील १७ ग्रंथ १९३६ पूर्वी म्हणजे बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या निर्णयापूर्वी प्रकाशित केले होते.

महाराजांनी यंदेंना ग्रंथ प्रकाशनात बौद्ध धर्मावरील मराठी ग्रंथांना अग्रक्रम देण्याची सूचना केली होती. पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ग्रंथ खरेदीसाठी बाबासाहेब ग्रंथपालांना बडोद्याला पाठवत असत असे संदर्भ सापडतात. १९०८ ते १९११ अशी तीन वर्षे महाराजांनी धर्मानंद कोसंबींना दरमहा ५० रुपयाची शिष्यवृत्ती देऊन महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार आणि बौद्ध धर्मावरील ग्रंथलेखनाचे काम दिले होते. बाबासाहेबांच्या धर्मांतराची सयाजीरावांनी केलेली ही पूर्वतयारी म्हणजे सयाजीराव आणि बाबासाहेब यांच्यातील बौद्धिक ऋणानुबंधाचा भक्कम पुरावा आहे.

बौद्ध धर्मातील तंत्र संप्रदायावरील अधिकारी पंडित म्हणून जगविख्यात असणारे बिनोयतोष भट्टाचार्य सुरुवातीला प्राच्यविद्या संस्थेच्या गायकवाड ओरिएंटल सिरिजचे संपादक व नंतर प्राच्यविद्या संस्थेचे संचालक एकूण २९ वर्षे बडोद्यात कार्यरत होते. मूळचे बंगालचे असणारे भट्टाचार्य 'बडोद्याचे भट्टाचार्य' म्हणून जगभर ओळखले जात होते. ब्राह्मणी, जैन आणि बौद्ध या तिन्ही धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासातून त्यांनी बौद्ध धर्मातील तंत्र संप्रदायाचे अनन्य महत्त्व उजेडात आणले. मध्ययुगीन हिंदू परंपरेतील शक्ती देवता आणि महायान पंथातील प्राज्ञ (Prajna) या देवतांमधील साम्य दाखवून देत भट्टाचार्यांनी बौद्ध धर्माच्या बुद्धोत्तर तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले.

## बडोद्यातील प्रागतिक कायदे आणि भारतीय राज्यघटना

१९१५ मध्ये सयाजीरावांनी पुरोहितांच्या धार्मिक मनमानीला चाप लावणारा 'हिंदू पुरोहित कायदा' बडोद्यात लागू केला. या कायद्याचा हेतू पौरोहित्याचे आणि धर्मशास्त्राचे शास्त्रोक्त आणि अद्ययावत ज्ञान असणाऱ्या लोकांडूनच हे विधी व्हावेत, लोकांच्या आर्थिक आणि धार्मिक पिळवणुकीला निर्बंध बसावेत हा होता. जगाच्या आजवरच्या इतिहासातील अशा प्रकारचा हा एकमेव कायदा आहे. या कायद्यानुसार हिंदू पुरोहित परीक्षा, याज्ञिक विषयातील किंवा श्रावण मास दक्षिणा परीक्षा यापैकी कोणत्याही परीक्षेत पास झाल्यास किंवा संस्थानाकडून विशेष बाब म्हणून मान्यता दिलेल्या व्यक्तीस संस्थानाकडून परवाना मिळाल्यावरच पौरोहित्याचा अधिकार प्राप्त होत होता.

हिंदू धर्मातील सर्व जातीच्या लोकांना पुरोहित होण्याचा अधिकार देताना विधीतील मंत्रांचे अर्थ यजमानाला त्याच्या मातृभाषेत समजून सांगण्याचे बंधन या कायद्याद्वारे घालण्यात आले. परीक्षा पास होऊन परवाना घेतल्याशिवाय पौरोहित्य केल्यास किंवा विधींचा अर्थ मातृभाषेत न सांगितल्यास २५ रुपये दंडाची तरतूद केली होती. हिंदू पुरोहित कायदा हा एक प्रकारे अस्पृश्यांना धार्मिक स्वातंत्र्य, धार्मिक सत्ता आणि धार्मिक समानता देणारा आधुनिक भारतातील सर्वात क्रांतिकारक कार्यक्रम होता. दुर्दैवाने बाबासाहेब वगळता आजअखेर या कायद्याचा उल्लेख एकाही विद्वानाने धर्मचर्चेत केल्याचा पुरावा सापडत नाही.

१९३६ मध्ये आपल्या 'Annihilation Of Caste' जगप्रसिद्ध छापील भाषणाच्या २४ व्या भागात धर्मसुधारणेचा कार्यक्रम देताना बाबासाहेबांनी २१ वर्षे आधी बडोद्यात अमलात आलेल्या पुरोहित कायद्यातील कलमांचा जसाच्या तसा उपयोग केला. यातच सयाजीरावांच्या पुरोहित कायद्याचे क्रांतिकारकत्व 'दडले' आहे. बाबासाहेबांसारखा जागतिक कीर्तीचा पंडित महाराजा सयाजीरावांच्या कायद्याचा आपल्या सर्वात महत्त्वाच्या मांडणीत जेव्हा आधार घेतो तेव्हा सयाजीरावांच्या प्रागतिक धर्मचिंतनाचे कालातीत स्वरूप अधोरेखित होते. तसेच सयाजीरावांना वारंवार विनंती करून १९३३ मध्ये दुसऱ्या जागतिक सर्वधर्म परिषदेचे अध्यक्षपद सन्मानाने का दिले गेले याचे उत्तर मिळते.

सयाजीरावांनी १९०५ मध्ये बडोद्यात लागू केलेल्या हिंदू कोड बिलाचे विवाह, दत्तक, पालक आणि मुले, वारसा हक्क, कौटुंबिक संबंध, कौटुंबिक संपत्ती असे एकूण ६ घटक होते. बडोद्याचा हिंदू पुरोहित कायदा २२ मे १९१३ मध्ये जनतेच्या सूचनांसाठी प्रसिद्ध करण्यात आला. लोकांनी सुचवलेल्या सूचना विचारात घेऊन दोन वेळा हा कायदा दुरुस्त करून ३० डिसेंबर १९१५ पासून तो बडोदा जिल्ह्यात लागू झाला. पुढे १९३३ ला तो संपूर्ण बडोदा संस्थानात लागू झाला. बाबासाहेबांनी ज्या हिंदू कोड बिलासाठी मंत्रिपदाचा राजीनामा दिला त्याची ही पायाभरणी होती.

अजून एक नवा संदर्भ या दृष्टीने चिंतनीय आहे. १९४० मध्ये भारतात पहिल्यांदाच बी.एन.राव यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या हिंदू कोड बिल समिती ही हिंदू कोड बिलाचा आरंभबिंदू होता. या समितीचे एक प्रमुख सदस्य व्ही.व्ही.जोशी होते ज्यांनी संस्कृत धर्मसंहितेतील हिंदू कायद्यांचा इंग्रजी मसुदा तयार केला. हिंदू कोड बिलाला जोशींचे सर्वाधिक योगदान असल्याचे बी.एन.राव यांनी या समितीच्या अहवालात म्हटले आहे. विशेष म्हणजे व्ही. व्ही. जोशी हे बडोदा संस्थानच्या उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते. ज्या हिंदू कोड बिलासाठी १९५१ ला बाबासाहेबांनी आपल्या कायदे मंत्रिपदाचा राजीनामा दिला त्या हिंदू कोड बिलाची अंमलबजावणी सयाजीराव महाराजांनी १९०५ लाच म्हणजे याअगोदर ४५ वर्षे सुरू केली होती. महाराजांच्या

क्रांतिकारक कायद्यांबाबत बाबासाहेब लिहितात, “बडोदे संस्थानात सामाजिक सुधारणांविषयी जे कायदे करण्यात आले ते युरोप व अमेरिकेतील कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राच्या तद् विषयक कायद्यापेक्षा पुढारलेले आहेत.” जगभरातील प्रगत राज्यघटनांबरोबर सयाजीरावांच्या या कायद्यांनी भारतीय राज्यघटनेला नक्कीच ऊर्जा पुरवली. म्हणूनच या दृष्टीनेही सयाजीरावांचा आदर्श बाबासाहेबांसमोर होता असे म्हणायला संधी आहे.

१९३९ मध्ये सयाजीरावांच्या निधनानंतर ‘जनता’मध्ये लिहिलेल्या मृत्युलेखात बाबासाहेबांनी त्यांच्या वैयक्तिक जीवनात आणि अस्पृश्योद्धाराच्या कामात महाराजांचे असणारे क्रांतिकारक योगदान स्पष्टपणे नोंदवून ठेवले आहे. बाबासाहेब लिहितात, “श्री. सयाजीराव महाराजांचे निधन ही माझी वैयक्तिक फार मोठी हानी झाली आहे. त्यांचे उपकार मी केव्हाही विसरणार नाही. मला त्यांनी जे शिक्षण दिले त्यामुळे आजची योग्यता मला प्राप्त झाली. अस्पृश्य जातीवर त्यांचे फार मोठे उपकार झाले आहेत. त्यांचाइतके अस्पृश्य जातीसाठी दुसऱ्या कोणीही कार्य केले नाही. ... त्यांनी सर्व सामाजिक घाणेरड्या चालींचा अभ्यास करून त्यातील दोष काढून टाकण्यात पुढाकार घेतला. स्वत:च्या प्रजेच्या कल्याणासाठी इतके सतत प्रयत्न दुसऱ्या कोणत्याही संस्थानिकांनी केले नाहीत. ... सयाजीराव महाराजांच्या मृत्यूने हिंदुस्थानातील एक फार मोठा मनुष्य नाहीसा झाला व बडोदे संस्थान फार मोठ्या राज्यकर्त्याला मुकले. महाराष्ट्रातील एक

विभूति नाहीशी झाली. सामाजिक सुधारणांचा पुढारी नाहीसा झाला. अस्पृश्यांचा एकमेव कैवारी गेला." यावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही.

जीवनाच्या शेवटच्या टप्प्यात बाबासाहेबांनी महात्मा फुल्यांचे चरित्र लिहिण्याचा मनोदय धनंजय कीरांसमोर व्यक्त केला होता आणि प्रकृतीची स्थिती पाहता माझ्याकडून हे काम होण्याची शक्यता नाही असेही ते कीरांना म्हणाले होते. भारताला अज्ञात असणारी आणखी एक बाब म्हणजे बाबासाहेबांना सयाजीरावांचे चरित्र लिहायचे होते. या संदर्भात महाराजांच्या निधनानंतर महाराजांचे नातू आणि बडोद्याचे उत्तराधिकारी प्रतापसिंह महाराजांना १० ऑक्टोबर १९५० रोजी बाबासाहेबांनी पत्र लिहिले. या पत्रात त्यांनी महाराजांचे चरित्र लिहिण्याची इच्छा व्यक्त केली होती.यावरून बाबासाहेबांच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात महात्मा फुल्यांनंतरचे स्थान सयाजीरावांचे होते ही बाब अधोरेखित होते. म्हणूनच 'भीमराव ते डॉ. आंबेडकर' या क्रांतीपर्वाचा इतिहास महाराजा सयाजीराव गायकवाड यांना वगळून लिहिता येणार नाही. नव्या पिढीतील पुरोगामी संशोधकांनी या दृष्टीने मार्गक्रमण केले तर सर्व जातींना जोडणारा पुरोगामी इतिहास भक्कमपणे पुढे येईल. परिणामी महाराष्ट्र खऱ्या अर्थाने 'पुरोगामी समाजरचनेची प्रयोगशाळा' म्हणून संपूर्ण देशाला मार्गदर्शक ठरेल.

●●●

## सयाजी ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सायाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# सयाजी ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळयात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी सयाजी ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही सयाजी ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
सयाजी ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com